सत्र खटला क्र.९५/२०२५.
सरकार –वि– मोहसिन + 1
निशाणी क्र. १६

सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नांव | – अन्सारशहा इस्माईलशहा |
| वय | – ४५ वर्षे. |
| व्यवसाय | – मजूरी |
| राहणार | –रा. बुलडाणा ता. जि. बुलडाणा. |

सरतपास सरकारी वकील श्री.भटकर यांचे मार्फत–

०१. दि.२६.०५.२०२४ रोजी मला पोलीसांनी पंचनाम्यासाठी बोलावले नाही तसेच माझेसमक्ष कोणतीही लिखापढी किंवा पंचनामा केला नव्हता. घटनास्थळ पंचनामा मला दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. तो नि.क्र.१७ वर आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही.

प्रस्तुतचा साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने, सरकारी वकीलांनी साक्षीदाराची उलटतपासणी घेण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.
उलटतपास सरकारी वकील श्री. भटकर यांचे मार्फत.

०२. हे खरे नाही की, दि.२६.०५.२०२४ रोजी पोलीसांनी मला तसेच मन्सुरखान कमरुददीनखान असे आम्हा दोघांना घटनास्थळी पंचनाम्यासाठी बोलावले होते. हे खरे नाही की, त्यावेळेस फिर्यादी यांनी तो घटनास्थळ दाखविले होते आणि त्यानुसार पोलीसांनी पंचनामा केला होता. हे खरे नाही की, त्यातील मजकूर आम्हास वाचून, समजावून सांगितल्यानंतर आम्ही त्यावर सहया केल्या. हे खरे नाही की, आरोपी माझे ओळखीचे असल्याने त्यांना वाचविण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास आरोपीतर्फे श्री. राज शेख वकील यांच्या मार्फत – नाकारला.
उलटतपास पुर्ण. फेरतपास काही नाही.

| | |
|---|---|
| वा.दा.ब. अ.क.क. | समक्ष |
| ASHOK GURUDASMAL SANTANI — Digitally signed by ASHOK GURUDASMAL SANTANI Date: 2026.02.26 13:13:16 +0530 | ASHOK GURUDASMAL SANTANI — Digitally signed by ASHOK GURUDASMAL SANTANI Date: 2026.02.26 13:13:23 +0530 |
| (ए. जी. संतानी) | (ए. जी. संतानी) |
| जिल्हा न्यायाधीश क्र. २ | जिल्हा न्यायाधीश क्र. २ |
| बुलडाणा | बुलडाणा |

दिनांक : २५/०२/२०२६.

सत्र खटला क्र.९५/२०२५.
सरकार –वि– मोहसिन + 1
निशाणी क्र. १६